# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 17/01/2022 (सोमवार)

(सायंकाळ)

---

**अवैधगावठी मोहाफुल दारू अड्ड्यात धाड**

**पोलीस स्टेशन जलालखेडा ची कार्यवाही**

पो.स्टे. जलालखेडा :– दिनांक 17/01/22 रोजी पोलीस स्टेशन जलालखेडा येथील स्टाफ पो.स्टे. परिसरात प्रोव्हिशन रेड कामी फिरत असतांना त्यांना मिळालेल्या माहिती वरून मौजा मोहाडी शिवार येथे दिनांक 17/01/22 चे 07.00 ते 08.00 वा. दरम्यान पोलीस स्टेशन जलालखेडा येथील स्टाफने सापळा रचुन मौजा मोहाडी शिवारात शेतात धाड घातली असता आरोपी क्र. 1) गुणवंत रामचंद्र उईके वय 46 वर्ष व 2) बलवानसिंग बावरी दोन्ही रा. बानोर ता.नरखेड हे नाल्या जवळ एका लोखंडी ड्रामला खालुन आग लावुन अवैधरीत्या मोहाफुल दारूची निर्मिती करतांना मिळुन आले. त्यांचे ताब्यातुन मोहाफुल सडवा 100 लिटर किमंत 10,000/–रू., दोन ड्रममध्ये थंड सडवा 300 लिटर किमंत 30,000/–रू., एका पांढ–या रंगाचा डबकी मध्ये मोहाफुल दारू 20 लिटर किमंत 4,000/–रू., दारूभट्टिचे साहित्य किमंत 5,600/–रू. असा एकुण कि. 49,600/– रू. चा रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक दिनेश जोगेकर पो.स्टे. जलालखेडा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 65(ई)(फ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम सहकलम 109 भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी क्र. 1 ला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक रंजित रोकडे मो.नं. 9823534459 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात पो.स्टे. जलालखेडा येथील ठाणेदार सपोनि श्री. हरिशचंद्र गावडे, पोलीस हवालदार रवि मोहोड, पोलीस नाईक दिनेश जोगेकर व रंजित रोकडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.





पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर